


# महासागर अमरावती

रविवार दि. 15 सप्टेंबर 2024




## आज संविधान मंदिराचे उद्घाटन




**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.14 )–** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्य विभाग अंतर्गत कार्यरत असलेले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तथा शासकीय तंत्र माध्यमिक विद्यालय या ठिकाणी संविधान मंदिराची उभारणी करण्यात आली आहे, याचा उद्घाटन सोहळा भारताचे उपराष्ट्रपती जगदीश धनवड यांचे शुभहस्ते एलफिंस्टन तंत्र विद्यालय मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कौशल्य विभागाचे मंत्री मंगलप्रसाद लोढा यांचे प्रमुख उपस्थितीत उद्या 15 सप्टेंबर 2024 ला सकाळी 11 वाजता संपन्न होणार आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये हा सोहळा ऑनलाइन संपन्न होणार आहे.

# दोन चिमुकल्यांसह चौघांवरही एकावेळी अंत्यसंस्कार

### ■ बेसरकर कुटूंबातील सदस्यांच्या मृत्यूने समाजमन सुन्न





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )–** संभाजीनगरातील वाळुजजवळ शुक्रवारी सायंकाळी एक भरधाव वाहन दुभाजकावरून उसळून रस्त्याच्या दुसऱ्या बाजुला धावत असलेल्या कारवर जाऊन धडकले. या भीषण अपघातात अमरावती शहरात राहणाऱ्या एका कुटुंबातील चार सदस्यांचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. चिमुकल्या लेकासह एक मुलगी, आई आणि आजीचाही मृत्यू झाला. या चौघांवरही शनिवारी (दि.14) अमरावती येथील हिंदू स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे अमरावती जिल्ह्यातील समाजमन सुन्न झाले.

अमरावतीमध्ये ऑगस्ट महिन्यातच बारशाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर अजय बेसरकर, मृणाली बेसरकर हे पुण्याला गेले. दरम्यान गौरी पुजनानिमीत्त ते दोन दिवसांपूर्वी अमरावतीत आले होते. त्यांच्या एका नातेवाईकांकडे गौरी पुजनाचा कार्यक्रम होता. हा आटोपून, मृणाली यांनी आई आशालता पोपळघाटे यांना आपल्या चिमुकल्याची काळजी घेण्यासाठी पुणे येण्याचा आग्रह केला. त्यानंतर अजय अंबादास बेसरकर हे शुक्रवारी पत्नी मृणालिनी, 6 महिन्यांचा चिमुकला, सासू आशा पोपळघट (65), मेव्हणी शुभांगिनी सागर गिते (35) व मेव्हणीची मुलगी दुर्गा सागर गिते (7) यांच्यासह कार क्रमांक एमएच 27 बीझेड 0045 ने संभाजीनगरमार्गे पुण्याला जात होते.



दरम्यान छत्रपती संभाजीनगर परिसरात त्यांच्या कारला भरधाव स्कॉर्पिओने जोराची धडक दिली. या धडकेत कारमधील मृणाली बेसरकर, आजी आशालता पोपळघाटे, त्यांची नात दुर्गा गिते व मृणाली यांचे सहा महिन्यांचे बाळ हे मृत्यूमुखी पडले, तर अजय बेसरकर व अन्य एका सदस्याचा समावेश आहे.

### मद्यधुंद वाहनचालकाजवळ परवानाही नव्हता

धक्कादायक बाब म्हणजे भरधाव वेगात वाहन चालविणारा ते तरुण मद्यधुंद अवस्थेत होते. सेच त्यांच्याकडे गाडी चालवण्याचा परवाना नसल्याचेही समोर आले आहे. या प्रकरणी दोन्ही तरुणांना अटक करण्यात आली आहे. विशाल उर्फ उद्धव ज्ञानेश्वर चव्हाण (22) आणि कृष्णा कारभारी केरे (19, दोन्ही रा. बलवाल नगर, वाळुज, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

### घनश्यामनगरावर दुःखाचे सावट

या घटनेनंतर मृणाली यांचे माहेर असणारे घनश्यामनगरातील घरी नातेवाईकांनी धाव घेतली. त्यामुळे शुक्रवारी दिवसभर पोपळघाटे यांच्या घरी नागरिक व नातेवाईकांची गर्दी झाली होती. या घटनेच्या माहितीवरून अमरावती पोलिसांनीही पोपळघाटे यांच्या घनश्याननगरातील घरी जाऊन चौकशी केली.

### सहा महिन्याच्या चिमुकल्याचा करुण अंत

अमरावती शहरातील सातुर्णा स्थित घनश्यामनगरात राहणारे ए.एच.पोपळघाटे यांच्या एका मुलीचे बेसरकर कुटुंबातील कुटुंबातील मुलाशी लग्न झाले. मुळचे अमरावतीचे अजय बेसरकर आणि त्यांच्या पत्नी मृणाली बेसरकर हे पुण्यामध्ये राहत होते. अजय आणि मृणाली यांच्या लग्नाला 10 वर्ष झाली मात्र मुल होत नव्हते. सहा महिन्यांपूर्वी त्यांच्या घरी पाळणा हलला. सहा महिन्यांनी घरी बाळाचे आगमन झाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. या बाळाच्या बारशाचा कार्यक्रमही अमरावतीमधील सातुर्णा स्थित महिंद्रा मंगल कार्यालयात 18 ऑगस्ट रोजी अगदी थाटामाटात पार पडला. 10 वर्षांनी घरी चिमुकल्या पावलांचे आगमन झाले होते. त्यामुळे बेसरकर कुटुंबात आनंदाचे वातावरण पसरले. पण हा आनंद देवाने सहा महिन्यातच हिरावून घेतला. अमरावतीमध्ये गौरी पुजनाच्या कार्यक्रमासाठी आलेले हे कुटुंब पुणे येथे जाण्यासाठी परत निघाले होते. दरम्यानच संभाजीनगरात हा अपघात घडला.

## ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील एक ठार, एक जखमी

### अकोला मार्गावरील तोंगलाबाद फाट्याजवळ अपघात





**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.14 )–** दर्यापूर–अकोला महामार्गातील तोंगलाबाद फाट्याजवळ एका अज्ञात भरधाव ट्रकची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकीवरील शैलेश वरुडकर (वय. 45 रा. चांडोळा) हे ठार झाले. तर दुसरे गंभीर जखमी झाले आहे. हा अपघात दि.14 सप्टेंबर रोजी 5 वाजताच्या सुमारास घडला. दर्यापूर पोलिसांना माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोलीस निरीक्षक सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल दांदळे व इतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहचून तपासणी केली. दुचाकी क्रमांक एम.एच. 27 वाय. 8653 आहे. जखमी व्यक्तीला ग्रामीण रुग्णालय दर्यापूर येथे नेण्यात आले आहे. पुढील तपास दर्यापूर पोलीस करीत आहेत.

## सोनाराच्या लुटमारीतील मुख्य आरोपीला धरले

### आतापर्यंत सहा आरोपी गजाआड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )–** जावरे नामक सराफा व्यवसायीकाला बंदुकीचा धाक दाखवून 25 किलोची चांदी जबरीने चोरून नेल्याप्रकरणातील मुख्य आरोपीला पोलिसांनी उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथून अटक केली आहे. याप्रकरणात पोलिसांनी आता सहा आरोपींना गजाआड केले आहे. तर यापूर्वी पोलिसांनी अटक केलेल्या पाच आरोपींना न्यायालयाने 16 सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. धनंजय योगेंद्रसिंग यादव (25, रा. बजानखाना, अंतू, जि. प्रतापगड, उत्तर प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे.जवाहरनगर येथील रहिवासी अरविंद जावरे आणि त्याचे वडील 4 सप्टेंबर रोजी दुचाकीवरून दागिन्यांचे दुकान उघडण्यासाठी जात असताना, अज्ञात लुटारुंनी त्यांना मारहाण करून बंदूक दाखविली आणि त्यांच्याजवळील चांदीच्या दागिन्यांनी भरलेली पिशवी घेऊन पळ काढला. यप्रकरणात



गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने आरोपी गयासुद्दीन वहाजोदिन कुरेशी (42) आणि मोहम्मद सादिक खान हारुण खान (37) यांना अटक केली. या आरोपींची चौकशी केल्यानंतर पोलिसांनी आरोपी प्रेम उर्फ प्रेमदास महादेवराव नितनवरे (53, रा. छत्रसाल नगर, अमरावती), विनोद शंकरराव गिरे (45, रा. दर्यापूर जि. अमरावती) आणि संजय बाबुलाल बिनकर (40, रा. मुनीरपुरा, राणीगंज, प्रतापगड, उत्तरप्रदेश) यांना अटक केली. त्यानंतर पोलीस मुख्य आरोपीचा शोध घेत होते. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने मुख्य आरोपी धनंजय योगेंद्रसिंग यादव याला प्रतापगड येथून अटक केली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रशांत माने, सहायक पोलिस निरिक्षण मनोज मानकर, संजय डाखोरे, भरत वानखडे, संजय इंगळे, गुलरेज खान यांनी केला. गाडगेनगर पोलिस ठाण्याचे डीबी पथक, नंदकिशोर करोची, महेश शर्मा, जयसेन वानखडे, नितीन कांबळी, सागर भोजने यांनी केला.

## कुख्यात अभिषेक डिक्यावर एमपीडीए



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )–** शहरातून तडीपार करण्यात आलेला कुख्यात गुन्हेगार अभिषेक उर्फ मामु रमेश डिक्याव (वय 23 वर्ष रा. मेहरबाबा कॉलनी, जेवड नगर, अमरावती) याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.अभिषेक डिक्याव हा सन 2019 पासुन गुन्हेगारी कारवाईमध्ये लिप्त आहे. त्याचे विरुध्द पोलीस स्टेशन राजापेठ, फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे खुन, दरोडा बद्दल शिक्षा, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याचा प्रयत्नासहीत जबरी चोरी किंवा दरोडा, दुखापत करणे, मृत्यु किवा जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी, पुरावा नष्ट करणे, प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवुन दंगा करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, इतरांच्या व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल अशी कृती करणे, अशा प्रकारचे गभीर स्वरूपाचे एकुण 07 गुन्हे दाखल आहे. त्याचेवर यापुर्वी प्रतिबंधक कारवई करण्यात आली आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले होते तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सक्रीय आहे. त्यामूळे अभिषेकवर राजापेठ पोलिसांच्या प्रस्तावावरुन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी एमपीडीएची कारवाई करुन मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द केले.

### दुभाजकावर धडकली शहर बस

**अमरावती–** रेल्वे क्रॉसींग उड्डानपुलावरून राजकमल चौकाच्या दिशेने जाणार्या सीटी बसचे अचानक ब्रेक फेल झाले आणि बस नेहरू मैदानासमोरील दुभाजकावर धडकली. ही घटना शनिवारी दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली. या अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. या अपघातात सीटी बसमधील सुमारे 40 प्रवासी थोडक्यात बचावले. माहितीनुसार, शहराची जीवनवाहिनी म्हटल्या जाणारी शहर बस क्रमांक एमएच 27–ए–9938 ही दुपारी एक वाजता नवसारीहून बडनेराकडे जात होती.

## मारहाण प्रकरणातील आरोपीला 3 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.14 )–** शहरातील विरूळ चौक येथील मारहाण प्रकरणातील आरोपीला 3 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चांदूर रेल्वे यांनी नुकतीच सुनावली आहे. विनोद गोरखनाथ खडसे (वय 38 वर्ष, रा. दिलावरपुर ता. चांदूर रेल्वे) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, 9 ऑक्टोंबर 2023 रोजी फिर्यादी ज्ञानेश्वर विश्वनाथ खडसे, वय 68 वर्ष रा. दिलावरपुर यांच्या जबानी रिपोर्ट वरुन पो.स्टे. चांदूर रेल्वे येथे कलम 324, 504, 506 भादंवी प्रमाणे आरोपी विनोद गोरखनाथ खडसे याचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपास अधिकारी यांनी जखमी यांचे जखमेबाबत वैद्यकीय अहवाल प्राप्त करुन सदर गुन्ह्यात कलम 326 भा.दं.वी. वाढ केली तसेच साक्षीदार यांचे बयान नोंदवून विहीत मुदतीत गुन्ह्याचा तपास पूर्ण केला व दोषारोप प्रथम वर्ग न्यायालय, चांदूर रेल्वे येथे दाखल केले. सदर प्रकरण साक्ष पुराव्यावर आल्याने तपास अधिकारी पोलीस उपनिरिक्षक नंदलाल लिंगोट यांनी केस मधील साक्ष पुरावे न्यायालयात हजर करण्याकरीता पाठपुरावा केला. आरोपी विनोद खडसे यांचेवरचा आरोप सरकारी वकील ए. ए. गहरवार यांनी सिध्द केला. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सचिन शिंदे यांनी सदर आरोपी हा कलम 324 भादंवी मध्ये दोषी आढळल्याने 3 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. 10 सप्टेंबर रोजी हा निकाल दिला आहे.सदर गुन्ह्याचा तपास ग्रामिण पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी आशित कांबळे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक अजय आकरे, पो.उप.नि. नंदलाल लिंगोट, ना.पो.कॉ. प्रशांत ढोके, कोर्ट पैरवी पो.कॉ. अमोल देशमुख यांनी साक्ष पुरावे वि. न्यायालयात हजर करुन दोषसिध्दी करीता पाठपुरावा केला.

# तयारी विसर्जनाची : 1800 पोलीसांचा चोख बंदोबस्त

### गणेश विसर्जनस्थळापर्यंत गणेश भक्तांना सुरक्षा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )–** शहरात गणपती विसर्जनाची गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहर पोलीस आयुक्तालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. यामध्ये आयुक्तालय स्तरावर 3 पोलिस उपायुक्त, 4 सहायक पोलिस आयुक्त, 25 पोलिस निरीक्षक, 70 सहायक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक, 1300 पोलिस अधिकारी, आरसीपी आणि क्यूआरटी प्लाटून, 1 एसआरपीएफ कंपनीसह 550 जवानांचा समावेश आहे. आणि महिला होमगार्ड, अशा एकूण 1800 हून अधिक पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहेत.

अमरावती शहरात शनिवार 7 ते 17 सप्टेंबर दरम्यान गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. 16 सप्टेंबर रोजी ईद–ए–मिलाद सण साजरा होत आहे. यावेळी शहरातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, 14 सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी छत्री तलाव या गणेशमूर्ती विसर्जन स्थळाच्या मार्गाची व जागेची पाहणी केली. यावेळी फरशी स्टॉपपासून छत्री तलावविसर्जन मार्गाची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याची माहिती देण्यात आली. बॅरिकेड्स, लाइटिंग योजना, आपत्कालीन टॉर्च, सीसीटीव्ही कॅमेरे, उंचीवरून विसर्जनस्थळावर लक्ष ठेवण्यासाठी मचान, छत्री तलावावर कृत्रिम तलाव तयार करणे, मिरवणूक मार्गावरील झाडांच्या फांद्यांची वर्गवारी करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, जलतरणपटू तैनात करणे आदी कामांबाबत महापालिका, महामंडळ, स्वच्छता विभाग, अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग, विद्युत विभाग आणि पोलीस अधिकाऱ्यांना ठेवण्याबाबत माहिती देण्यात आली.

### गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी कुख्यात गुन्हेगार, समाजकंटक आणि जातीय दंगलीचा आरोप करणाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### ठिकठिकाणी फिक्स पॉइंट

आयुक्तालय क्षेत्रातील पोलीस ठाणे निहाय शहरातील महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे, संमिश्र व संवेदनशील वस्ती या ठिकाणी फिक्स पॉइंट बसविण्यात येणार आहेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी 12 सीआर मोबाईल व्हॅन, 7 दामिनी पथक, बीट मार्शल आणि डायल 112 वाहने शहरात सतत गस्त घालणार आहेत.

### सोशल मीडियावर लक्ष

शहरातील चौकाचौकात पोलिसांची करडी नजर राहणार आहे. याबरोबरच सायबर सेल पोलिसांचे विशेष पथक सोशल मीडियावरही लक्ष ठेवणार आहे. मिरवणूक मार्ग आणि विसर्जनाच्या ठिकाणांवर सीसीटीव्ही आणि व्हिडिओग्राफरच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. मिरवणुकीत ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, लाठ्या, आक्षेपार्ह गाणी वाजवणे, आक्षेपार्ह झांकी दाखवण्यास मनाई करण्यात आली आहे.

### मिरवणूक मार्गाची पाहणी

16 सप्टेंबर रोजी ईद–ए–मिलाद निमित्त शहरात मिरवणूक काढण्यात आली. त्यामुळे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी मिरवणूक मार्गाची पाहणी केली. मिरवणुकीच्या मार्गावर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी व बंदोबस्त अधिकारी यांना माहिती देण्यात आली.

## जुन्या पेन्शनसाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा एल्गार




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )–** राज्यात 1 नोव्हेंबर 2005 रोजी त्यानंतर शासन नोकरीत लागलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना जुनी पेन्शन लागू करावी, अशी विविध संघटनांची मागणी आहे. जो पक्ष ही मागणी मान्य करेल त्यालाच मतदान अशी भूमिका आता संघटनांनी घेतली आहे. यासाठी 15 सप्टेंबरच्या शिर्डी येथील पेन्शन राज्य संमेलनात आवाज बुलंद करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना सतत जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी विविध आंदोलन राज्यभर करीत आहे. मात्र, सरकार जुनी पेन्शन न देता डीसीपीएस, एनपीएस, आता केंद्र सरकारची यूपीएस व राज्याची सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजना जीपीएस आदी योजना आणत आहे. मात्र, या सर्व योजना कर्मचारी यांच्या भविष्याच्या हिताच्या नसून फक्त काहींच्या फायद्याच्या असल्याचा आरोप संघटनेद्वारा करण्यात आला. कर्मचारी व अधिकारी यांनी यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष गौरव काळे, अतुल कडू, कुंदन ठाकूर, योगेश पखाले, कासीम जमादार, आशिष ढवळे, संचिता गोगटे, प्रवीण निंभोरकर, पवन साबळे, प्रज्वल घोम, रितेश जगताप, यश बहिरम, सुधीर बहादे, स्वप्नील देशमुख, भावना राऊत, प्राजक्ता राऊत, प्रिया पळसकर, योगिता वाकोडे, रूपाली झोड, प्रीती दिवाण आदींनी केले आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४



# महासागर अमरावती

रविवार दि. 15 सप्टेंबर 2024

# दुचाकींच्या कर्णकर्कश आवाज उठतोय जीवावर

## अल्पवयीनांच्या हातातील सुसाट वाहने बनली धोकादायक

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.14 )–** तुम्ही एखाद्या विचारात असावे आणि पाठीमागून येणाऱ्या एखाद्याने तुमच्या कानाजवळ फटाका फोडावा, तुमच्या तोंडातून त्या फटाका फोडणाऱ्यासाठी अत्यंत संतापजनक शिव्याशाप आल्याशिवाय राहणार नाही. नेमकी हीच परिस्थिती दररोज जनसामान्यांची होत आहे. अल्पवयीनाच्या हातात असणाऱ्या आणि सुसाट धावत कर्णकर्कश आवाज करणाऱ्या फटाक्यासारखा आवाज करणाऱ्या दुचाकींनी नागरिक त्रस्त झाले आहे.

लोकवस्तीसह व सायलेन्स झोनमध्येही आवाजाच्या तीव्रतेच्या मर्यादेचे या दुचाकींकडून सर्रास उल्लंघन होत आहे. मात्र या संदर्भात प्रशासनातर्फे कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांची प्रचंड नाराजी आहे.

चांदूरबाजार शहरात तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर मोटरसायकल या मॉडीफाय करून त्यात कर्णकर्कश हॉर्न आणि बुलेट वाहनांमध्ये लावलेल्या सायलेंसरच्या आवाजामुळे ह्यद्याची स्पंदने वाढून शारिरीक इजा होण्याची भीती निर्माण होते. परंतू अश्या एकाही वाहनावर चांदूर बाजार पोलिसांकडून कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे अश्या दूचाकीधारकांची हिंमत आणखीनच वाढली आहे. अश्या वाहनांवर अंकुश लावण्याकरिता पोलिसांनी पुढाकार घ्यावा, अन्यथा आम्हीच पुढाकार घेत कायदा हातात घेवू असा सज्जड इशारा नागरिक आता समाज माध्यमांवर द्यायला लागले आहे.



### स्टंटबाज नव्हे तर जीवंत बॉम्ब

शहरात सुसाट वेगाने नागरिकांना कट मारत स्टंट करणाऱ्या दुचाकी चालकांची संख्या वाढली आहे. हे स्टंटबाज दुसऱ्याच्या जीवाला धोका निर्माण करित असल्याने हे जीवंत बॉम्बपेक्षा कमी नाही. त्यामुळे आरटीओ विभाग, ग्रामीण पोलिसांचा वाहतूक विभाग, संबधित ठाण्याच्या ठाणेदारांनी स्वत: पुढाकार घेवून नागरिकांच्या जीवाला धोका पोहोचविणाऱ्या अश्या लोकांवर कडक कारवाई करायला हवी, जेणेकरुन भविष्यात त्यांनी अश्याप्रकारची स्टंटबाजी पुन्हा करु नये.

कर्णकर्कश वाहनांवर लवकरच कारवाई सुरु केली जाईल. वाहन चालविणारा दुचाकीधारक हा अल्पवयीन असेल तर त्यांच्या पालकावर गुन्हे दाखल करण्यात येईल. अश्या दुचाकीधारकांनाही आवाहन आहे की, त्यांनी आवाज करणाऱ्या वाहनांचे सायलेंसर काढून टाकावे, अन्यथा त्यांना दुपटीने दंड सहन करावा लागेल.

**–सुरज बोंडे,**
पोलीस निरीक्षक, चांदुर बाजार, पोलीस स्टेशन.

# साथ रोगामुळे जामली गावात प्रशासन अलर्ट मोडवर

## परिस्थिती नियंत्रणात: गावात फवारणी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि. 14 ) –** चिखलदरा तालुक्यातील जामली गावात व्हायरल आणि अतिसाराचे रुग्ण निघाल्याने आरोग्य विभाग अलर्ट मोडवर आहे. गावात फॉगिंग मशीन ने फवारणी करण्यात आली आहे. परिस्थिती नियंत्रणात आहे.

दुसरीकडे दीड कोटी रुपये खर्च करून निर्माण करण्यात आलेली पाणीपुरवठा योजना कुचकामी ठरली आहे. ठिकठिकाणी लिकेज असल्याने गढूळ पाण्याचा शिरकाव झाला व गावात अतिसार ची लागण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तिघांच्या मृत्यूला संबंधित अधिकारी व कंत्राटदार जबाबदार असल्याचा आरोप उपसरपंच विनायक येवले यांनी केला आहे.

डेंगूचे पाच तर चिकनगुनिया चे तीन रुग्ण जामली आर गावात अतिसार चे थैमान असतानाच रक्त नमुने तपासणीत डेंग्यू चे पाच तर चिकनगुनियचे तीन रुग्ण आढळून आले आहे. त्यामुळे या गावावर आता नवीन संकट आले आहे. आरोग्य यंत्रणेवर जबाबदारी वाढली असून जिल्हा प्रशासनाने तत्काळ गंभीर दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. अशी घटना अजूनही दुसऱ्या गावात होऊ नये याची सुद्धा दखल प्रशासनामार्फत घेण्यात येत आहे. या अगोदरही तालुक्यातील अनेक गावांमध्ये साथ रोगाची लागण होऊन अनेक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. मात्र तरीही तालुका प्रशासनामार्फत तालुक्यातील नागरिकांना शुद्ध पाणी सुद्धा उपलब्ध होत नाही, ही शोकांतिका आहे. तरी संबंधित लोकप्रतिनिधींनी ही बाब गंभीरतेने घेऊन मेळघाटातील आदिवासी बांधवांना किमान शुद्ध पाणी तरी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी होत आहे.



दीड कोटी रुपये खर्चून पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. ठिक ठिकाणी लिकेज असल्यामुळे गावात गढूळ पाण्याचा शिरकाव झाला, त्यातून अतिसारची लागण व तिघांचा मृत्यू झाला संबंधितांवर कारवाई करण्यात यावी.

**विनायक येवले, उपसरपंच**
**जामली आर ग्रामपंचायत.**

# तालुक्यातील शेतकऱ्यांना दिवसा आठ तास विज द्या!

## ॲड. यशोमती ठाकूर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )–** शेतकऱ्यांना दिवसा किमान आठ तास वीज मिळावी ,अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. ही मागणी पूर्ण करण्यात यावी, अशा सूचना आपण महावितरण विभागाच्या अधिका–यांना दिल्या असल्याची माहिती काँग्रेसच्या माजी मंत्री आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली आहे. ग्रामिण विभागा अंतर्गत अमरावती ग्रामिण उपविभाग व भातकुली उपविभागातील सर्व तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची आढावा बैठक शुक्रवारी बचत भवन येथे पार पडली. या आढावा बैठकीत शेतकऱ्यांच्या तक्रारी महावितरणच्या अधिकाऱ्यांसमोर मांडून त्याबाबतचा आढावा घेण्यात आला.



भातकुली व अमरावती तालुक्यातील तालुक्यातील महावितरणचा ढेपाळलेला कारभार आणि महावितरण विरोधात तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या तक्रारीची दखल घेत आ. ॲड. यशोमती ठाकुर यांनी शुक्रवारी बचत भवनच्या सभागृहात महावितरणचे कार्यकारी अभियंता यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली. यावेळी पूर्णानगर, वातोंडा, हिंमतपूर, वाठोडा शुक्लेश्वर या मुख्य गावांमधील कृषीपंप धारक शेतकऱ्यांना त्रास होता कामा नये तसेच या भागात छोट्यामोठ्या कामांमध्ये महावितरण कडुन हयगय झाल्यामुळे घरगुती विज ग्राहकांना मनस्ताप होत असुन त्यांच्या समस्यांचे दिवाळीपूर्वी निरसन करण्याच्या स्पष्ट सुचना यावेळी आमदार ठाकूर यांनी केल्या यावर आलेगावकर यांनी स्वत: जातीने लक्ष घालुन या सर्व समस्यांचे निराकरण करण्यात येईल असे सांगीतले. याप्रसंगी आ.ॲड.यशोमती ठाकुर यांच्यासह महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता अनिरुद्ध आलेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रत्येक गावातून आलेल्या शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त करत आपापल्या गावातील महावितरणचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणला. त्यावर स्थानिक अधिकाऱ्यांची कानउघाडणी करून तालुक्यातील समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल, असे अनिरुद्ध आलेगावकर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आश्वस्त केले. महावितरण कंपनीकडुन शेतकऱ्यांना आठवड्यातून तीन दिवस सकाळी व चार दिवस रात्री विद्युत पुरवठा करण्यात येतो. परंतु रात्रीचे सिंचन करणे अतिशय जोखमीचे असल्याने रात्री ऐवजी दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली. या मागणीचा तातडीने पाठपुरावा करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशा सूचना ॲड.ठाकूर यांनी यावेळी दिल्या. यावेळी अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड, अमरावती कृउबासचे सभापती हरिश मोरे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

# महात्मा फुले यांचा अपमान करणाऱ्या मोहन भागवत यांनी माफी मागावी?



## एसडीओ मार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.14 )–** स्थानिक सर्व शाखीय माळी समाज ऋणानुबंध महासंघाचे वतीने मोर्शीच्या उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना माफी मागण्यास बाध्य करण्यात यावे व त्यांनी पुन्हा वाचाळ वक्तव्य करू नये म्हणून त्यांना तंबी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सामाजिक क्रांतीचे आद्य प्रणेते म. ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाचा अधिकार नसलेल्यांना शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांची सन 1869 साली स्वत: समाधी शोधून काढली. पहिली शिवजयंती साजरी केली. हा इतिहास आहे. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांनी बा.ग.टिळक या ब्राह्मणाने मराठी छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढल्याचे वक्तव्य केले. ते बिन बुडाचे कपोलकल्पित, निराधार व महात्मा फुले यांच्या क्रांतिकार्याचा अपमान करणारे आहे. त्यामुळे फुले शाहू आंबेडकरांच्या समस्त अनुयायांची मन दुखावली. तेव्हा मोहन भागवत यांनी माफी मागावी व पुन्हा असे वाचाळ वक्तव्य करू नये म्हणून त्यांना समज देण्यात यावी, अन्यथा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आदी बहुजन समाजासह अल्पसंख्यांक यांच्या मनातील धगधगत्या रोषाचे परिणाम भोगण्यास तयार रहा. असा मनुवादी शासनाला इशारा देण्यात आला आहे. उपविभागीय अधिकारी मोर्शी यांना निवेदन देतेवेळी, समाजभूषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड, सुरेशराव टवलारे, अजय पाटील, अंबादास सिनकर, गजानन हिरुळकर, महेंद्र भातकुले, वसंतराव भडके, मधुकर आखरे, दिगंबरराव यावतकर, रवींद्र साबळे, डॉ. भीमराव चंदनकर, सुरेश केंडे, रामदास भातकुले, अनिल भातकुले, शंकरराव फरकाडे, सतीश लेकुरवाडे, संकेत भोजने, स्नेहल सोनार, निलेश पवार, नंदकिशोर लेकुरवाळे, इत्यादी सह महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अनुयायी उपस्थित होते.

# जीवन देणारी लसच ठरली का मृत्यू चे कारण?

## करजगाव आरोग्य केंद्रातील प्रकार | दुसऱ्याच दिवशी दगाविले बालक




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.14 )–** तालुक्यातील करजगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत दीड महिन्याच्या बाळाचा लसीकरणाच्या दुसऱ्या दिवशीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना 13 सप्टेंबर रोजी उघडकीस आली.

आदित्य अरुण उईके ( रा.इंदिरानगर, करजगाव ) असे मृत्यू झालेल्या बालकांचे नाव आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र येथे 12 सप्टेंबर रोजी झालेल्या लसिकरणात एकूण दहा बालकांना लोटा व पेंटा चे लसीकरण करण्यात आले होते. त्यातच दगावलेल्या आदित्य नामक बालकाचा समावेश होता. 12 सप्टेंबर रोजी 1 वाजता दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र येथे लसीकरण झाले. लसीकरण झाल्यानंतर मृत बालकाची आई त्याला घरी घेऊन गेली. त्यानंतर आदीत्य झोपला. नंतर 2 वाजता दरम्यान तो बालक झोपेतून रडत उठला. तो 4 वाजे पर्यंत रडतच होता. नंतर त्या बालकाला थंड पाण्याचे पुसून काढले. काही वेळाने तो पुन्हा झोपी गेला. नंतर पुन्हा रात्री साडे अकरा वाजता तो रडत उठला. आईने त्याला दूध पाजून पुन्हा झोपविले. आदित्य शांत झोपी गेला. मात्र दुसरा दिवस उजाडला होता दिवस अत्यंत वेदना दायक ठरला, कारण त्या चिमुकल्या आदित्य वर काळाने घाला घातला होता. जेव्हा आदित्यचे वडील सकाळी कामावर जाण्यासाठी उठले तेव्हा त्यांनी आदित्य ला आवाज दिला. तेव्हा त्यांना आधी वाटले की आदित्य बरे नसल्याने झोपला असेल, वारंवार आवाज देऊनही तो जागी न झाल्याने त्यांनी आशा दीदींना बोलावले. आशा दीदींनी पाहणी केल्यावर आदित्यचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले. ऐकताच क्षणार्थात होत्याचे नव्हते झाले.त्या चिमुरड्या मातेने टाहो फोडला. आशा दीदींनी या प्रकाराची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली. नंतर आरोग्य विभागाची चमू दाखल झाली असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ सुजाता भगत यांनी दिली. घटनेची माहिती शिरजगाव पोलिसांना मिळताच प्राथमिक आरोग्य केंद्र गाठले. तेव्हा मृतक बालकाचा नातेवाईकांचा जमाव संतप्त झाला होता. परंतु मृतक बालकाच्या नातेवाईकांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात रोष व्यक्त केला. यावेळी सांप्रदायिक कारण देत शवविच्छेन करण्यास स्पष्ट नकार दिला. वृत्त लिहेस्तोवर पोलिसात अद्याप तक्रार नोंदविण्यात आलेले नव्हती.

### प्राथमिक आरोग्य केंद्रात या आधीही बेजबाबदारपणा

प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक रुग्णावर चुकीचा उपचार झाल्याची सूत्रांकडून प्राप्त आहे . अनेकांना अपंगत्व आले असल्याची खात्रीशीर माहिती आहे. त्यात सोनू जोंधळे या महिलेला अपंगत्व आले असून ती अद्याप न्याय मिळवण्यासाठी धडपड आहे. असे असताना तालुका आरोग्य अधिकारी मात्र भ्रमणध्वनिला प्रतिसाद देत नाही. त्यामुळे तालुक्याचा आरोग्य विभागकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे आहे. अश्या कर्तव्याला पाठ दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांची तालुक्यात संख्या मोठ्याप्रमाणात आहे.

12 सप्टेंबर रोजी झालेल्या लसीकरण एकूण दहा बालकांना लसीकरण केले होते. त्यात मृतक आदित्य चा सामावेश होता. मृत्यू झाल्याची माहिती सकाळी 7 वाजता भ्रमणध्वनी वर मिळाली . जिल्ह्याची चमू आली असून चौकशी करून गेली आहे.

**डॉ.सुजाता भगत,**
**वैद्यकीय अधिकारी**

# स्मशानभूमी असावी अशी, सुसज्ज, सुंदर आणि सकारात्मकतेने भारलेली!

## ज्यांनी भेटी दिल्या त्यांनीही केले कौतुक

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.14 )–** स्मशानभूमी म्हटलं की डोळ्यांपुढे नकारात्मक, अत्यंत जुजबी सुविधा व साधने असलेले उदासिन चित्र उभे राहते. पण जवळच्यांना गमावलेल्यांना काहीसा आधार मिळावा अशी सुंदर, सुसज्ज स्मशानभूमी तालुक्यातील शेंदूरजनाघाट मध्ये उभारली गेलीय. त्या स्मशानभूमीत भारलेली सकारात्मकता दु:खातील मनाला उभारी देण्यास मदत करण्याची अपेक्षा आहे.

घरातील कोणाचा मृत्यू झाल्यास त्या कुटुंबावर शोककळा पसरलेली असते आणि अशा वेळी अंत्यविधीसाठी होणाऱ्या कष्टांमुळे त्यांच्या दुखात साहजिकच आणखी भर पडते. परंतु अशा दुखात बुडालेल्या या कुंटुबांचा संवेदनशीलतेने विचार करुन, दुखाची तीव्रता कमी करण्याच्या हेतूने एक सुसज्ज आणि सकारात्मकतेने भरलेली स्मशानभूमी उभारण्यात आली. अनेक गावात अंत्यसंस्कार करण्यासाठी जागा उपलब्ध नसते.जिथे जागा असते तिथे सुविधा नसतात. परंतु तालुक्यातील शेंदूरजना घाट येथील अंत्यसंस्कार करण्यासह इतर सुविधा इतर कोठे नसाव्या असा अनेकांचा दावा आहे. येथे अंत्यसंस्काराठी दुरून दुरून नागरिक येतात. अंत्यसंस्कारा दरम्यान बसण्यासाठी हजारो नागरिक बसु शकतील यासाठी मोठा मंडम बांधण्यात आला. जिल्ह्याबाहेरून नागरिक येथे येत असल्याने कायमस्वरूपी रुबाबदार शेड बांधण्यात आले. ही स्मशानभूमी सुंदर, सुसज्ज आहेच पण तिथं भारलेली सकारात्मकता दु:खातील मनांनाही उभारी देणारी ठरत आहे.




# प्रिती बंड यांची जि.प. शाळेला शिक्षकदिनी भेट

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.14 )–** शिक्षक दिनानिमीत्त प्रिती संजय बंड यांनी बडनेरा मतदार संघातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांना भेट देवुन आपल्या आयुष्यात सकारात्मक विचारांचे आणि ज्ञानाचे बीज रोवणाऱ्या शिक्षकांचे शाल व पुष्पगुच्छ देवुन सर्व शिक्षकांचे सत्कार करण्यात आले. यानिमित्ताने जि.प. पुर्व माध्यमिक शाळा,पार्डी (देवी) प्रिती संजय बंड यांनी भेट दिली असता शाळेतील शिक्षकांचा गौरव सत्कार करण्यात आला.

सर्वप्रथम डॉ.राधाकृष्णन यांच्या फोटोचे त्यांनी पूजन केले. त्या नंतर शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच इतर शिक्षकांचा सत्कार केला. जीवनात गुरुचे महत्व अनन्यसाधारण आहे. गुरुचे स्थान वंदनीय आहे असे प्रीती बंड यांनी चर्चा करतांना विचार व्यक्त केले.

प्रिती बंड यांनी विदयार्थ्यांच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी हितगुज केली. विद्यार्थ्यांना काही इंग्रजी प्रश्न विचारले व विद्यार्थ्यांनी सुध्दा इंग्रजीतून प्रश्नांची उत्तरे दिली. शिक्षकांचा सत्कार करताना प्रिती बंड आनंद व्यक्त केला जणू त्या त्यांचे विद्यार्थी जीवन आठवत होत्या. त्यांच्या स्थानी गुरुप्रती असलेला आदर दृष्टीस येत होता. प्रिती बंड यांनी पुष्प गुच्छ देऊन मुख्यध्यापिका विजया झाडे यांनी त्यांचे स्वागत केले व आभार व्यक्त केले.

